दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४०५ वा ● सोमवार, ता. १५ सप्टेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## माजी मुख्य न्यायाधीश सुषीला कार्की प्रधानमंत्रीपदी विराजमान

### नेपाळला महिला नेतृत्वाची नवी दिशा



**काठमांडू । रयत समाचार**

नेपाळच्या राजकीय इतिहासात एक महत्वाचा टप्पा गाठला गेला आहे. देशाच्या माजी मुख्य न्यायाधीश सुषीला कार्की यांनी रविवारी राजधानी काठमांडूतील सिंहदरबार येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात अंतरिम प्रधानमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. या शपथविधीला प्रमुख नेते, न्यायमूर्ती व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्की यांच्या नियुक्तीमुळे नेपाळमध्ये राजकीय संक्रमण काळात महिलांच्या नेतृत्वाला मिळालेला हा मोठा सन्मान मानला जात आहे. न्यायव्यवस्थेत दीर्घ अनुभव, पारदर्शक कार्यपद्धती आणि कठोर निर्णयक्षमता यासाठी ओळखल्या जाणाऱ्या कार्की यांनी ''लोकशाहीचे रक्षण व सुशासनाची अंमलबजावणी हीच माझी प्राथमिकता असेल,'' असे सांगत जबाबदाऱ्या स्वीकारल्या. नेपाळच्या राजकारणातील अलीकडील उलथापालथीनंतर स्थैर्य निर्माण करण्यासाठी त्यांच्याकडे मोठे आव्हान आहे. महिला नेतृत्वाची ही ऐतिहासिक नोंद नेपाळच्या लोकशाही प्रवासाला नवा अध्याय देणारी ठरणार आहे.



## सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात 'सीओईपी अभिमान' पुरस्कार वितरण

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मान्यवरांचा गौरव

**पुणे । रयत समाचार**

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या ग्रंथालय व संगणक अभियांत्रिकी विभागाच्या नूतन इमारतीचे उदघाटन रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या सोहळ्यात महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी 'सीओईपी अभिमान पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ज्येष्ठ शास्त्रज्ञ वसंथा रामास्वामी यांना 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. जीवन गौरव पुरस्कार : वसंथा रामास्वामी (१९६७, मेकॅनिकल बॅच) माजी शास्त्रज्ञ, एआरडीई (डीआरडीओ). विलास जावडेकर (१९७२, सिव्हिल बॅच) संस्थापक व चेअरमन, व्हीजे डेव्हलपर्स. डॉ. महंतेश हिरेमठ (१९७५, सिव्हिल बॅच) माजी अध्यक्ष, अमेरिकन सोसायटी ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स. जयंत इनामदार (१९७५, सिव्हिल बॅच) व्यवस्थापकीय संचालक, स्ट्रडकॉम कन्सल्टंट्स प्रा. लि. उन्मेष वाघ (१९९३, मेकॅनिकल बॅच) चेअरमन, जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी. तुषार मेहेंदळे (१९९७, मेकॅनिकल बॅच) व्यवस्थापकीय संचालक, इलेकट्रोमेक मटेरियल हँडलिंग सिस्टिम्स (I) प्रा. लि. श्रावण हर्डीकर (२०००, इंस्ट्रुमेंटेशन बॅच) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या सोहळ्यात मान्यवरांनी आपल्या आठवणींना उजाळा देत सीओईपीशी असलेल्या नात्याचा विशेष गौरव केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुरस्कारार्थींच्या कार्याचा गौरव करताना, ''सीओईपीचे माजी विद्यार्थी देश-विदेशातील तंत्रज्ञान, बांधकाम, संशोधन, वाहतूक व औद्योगिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देत आहेत. यामुळे महाराष्ट्राचे आणि भारताचे नाव उज्ज्वल होत आहे,'' असे प्रतिपादन केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यापीठाच्या सीओईपीयन स्मरणिकेचे प्रकाशन केले.

## सरकारी नोकऱ्यांवर खाजगी कंत्राटदारांचा डल्ला- कुंभार

### आरक्षणाचा बळी ठरतेय तरुणाई

**पुणे । रयत समाचार**

राज्यात एकीकडे आरक्षणासाठी आंदोलने, ठिय्या, उपोषणे सुरू आहेत. समाजघटक आपल्या हक्कांसाठी झगडत आहेत. परंतु दुसरीकडे सरकारी नोकऱ्यांवर गुपचूप खाजगी कंत्राटदारांकडून डल्ला मारला जात आहे. जवळपास प्रत्येक खात्यात आज कंत्राटी पद्धतीने बाह्ययंत्रणेद्वारे भरती सुरू असून, त्यात कुठल्याही प्रकारचे आरक्षण लागू नसल्याने मागासवर्गीय व सामान्य तरुणाई वंचित राहतेय, अशी खंत माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार व्यक्त केली. अधिक माहिती देताना कुंभार म्हणाले, या कंत्राटी भरती प्रक्रियेत पारदर्शकतेचा पूर्ण अभाव असून निव्वळ मनमानी कारभार सुरू आहे. अशा प्रकारच्या नियुक्त्या नियमित पदांवर होत असल्याने, आरक्षणाची अंमलबजावणी होण्याऐवजी त्याचा बळी जात आहे. त्यामुळे सरकारी सेवेत प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या तरुणांना कायमची नोकरी तर दूरच, तात्पुरती संधीही मिळणे कठीण होत चालले आहे. सरकारी नोकऱ्यांच्या नावाखाली केवळ करारावर काम करवून घेतलं जातं. त्यात पगार कमी, नोकरीची हमी नाही, भविष्य निर्वाह निधी व इतर सुविधा नाहीत. त्यामुळे तरुणाई नकळत वेठबिगारगिरीकडे ढकलली जात आहे. शिक्षण घेऊनही तरुण पिढी हताश व दिशाहीन होताना दिसत आहे, असेही कुंभार म्हणाले. ३-४ कंपन्यांचा मक्तेदारीचा खेळ आरक्षण व सरकारी नोकऱ्यांच्या संकल्पनेला खीळ घालण्यामध्ये ठराविक ३-४ कंपन्यांची मक्तेदारी असल्याचे आरोप होत आहेत. सरकार आणि राजकारण्यांच्या आशीर्वादाने या कंपन्यांनी सरकारी यंत्रणा काबीज करून ठेवली आहे. त्यामुळे 'सरकारी नोकरी' ही संकल्पना इतिहासजमा होण्याचा धोका निर्माण झाला आहे. जनतेत असंतोष वाढतोय एकीकडे आरक्षणासाठी समाजरचना पेटलेली असताना दुसरीकडे सरकारी नोकऱ्यांवरच डल्ला बसल्याने सामान्य तरुणाईत असंतोष उसळत आहे. जर ही परिस्थिती थांबवली नाही तर येणाऱ्या काळात सरकारी सेवेत आरक्षण हा शब्द फक्त कायद्याच्या पानांवर उरेल, असा इशारा समाजतज्ज्ञ व अभ्यासक विजय कुंभार यांनी दिला.



## ...आता त्या ठिकाणी एका बाजूला चर्मकार तर दुसऱ्या बाजूला भाजी विक्रेत्यांचा व्यवसाय

**बेळगाव । रयत समाचार**

शहापूर बॅरिस्टर नाथ पै चौक येथील रस्त्याच्या दुभाजकावर गाळे बांधण्यात आले होते. दुकान गाळे गेल्या चार वर्षांपासून धूळ खात पडले होते.त्या जागेचा गैरवापर केला जात होता. या पार्श्वभूमीवर आम. अभय पाटील यांनी त्या जागेची पाहणी करून, लवकरच त्या ठिकाणी चर्मकार व्यवसाय त्याचबरोबर भाजी मार्केट सुरू करण्यात येणार आहेअशी माहिती दिली आहे. आम.अभय पाटील यांनी शहापूर नाथ पै चौकाकडून खासबाग बसवेश्वर चौकाकडे जाणाऱ्या मार्गावरील दुभाजकावर व्यावसायिक गाळे बांधण्याचे काम गेल्या चार वर्षांपुर्वी केले.या ठिकाणी शहापुरातील मुख्य मार्गावर बसून भाजी विकणाऱ्या, विक्रेत्यांना या ठिकाणी स्थलांतरित करण्यात येणार होते.

परंतु हे काम रेंगाळले. त्याचबरोबर चार वर्षे झाले तरी त्या जागेत बांधण्यात आलेल्या दुकानांचा वापरच झालेला नाही. ती जागा तळीरामांसाठी मोक्याचे ठिकाण बनले होते.त्याचबरोबर दुकानांच्या बाहेर असलेल्या जाळ्यांवर कपडे वाळत घालण्याची जागा बनली होती. लाखो रुपये खर्च करुनही या जागेचा वापर होत नसल्याबद्दल नॅशनल टुडे ने सातत्याने या संदर्भात प्रशासनाला जाग आणून देण्याचे काम केले होते. दरम्यान दक्षिणचे आमदार अभय पाटील यांनी नुकतीच या जागेला भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर बोलताना ते म्हणाले,काही कारणामुळे या जागेत व्यवसाय सुरू झालेले नाहीत. मात्र लवकरच या ठिकाणी एका बाजूला चर्मकार व्यवसाय तर दुसऱ्या बाजूला भाजी विक्रेत्यांना दुकाने देण्यात येतील.याचबरोबर दुकानांचे सुशोभीकरण करण्यात येईल. रंगरंगोटी तसेच लाईटची व्यवस्था करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

## किसान सभा, शेतमजूर युनियन व पक्ष कार्यालय उभारणीचा दिल्लीत शुभारंभ

**दिल्ली । रयत समाचार**

दिल्ली येथे अखिल भारतीय किसान सभा, शेतमजूर युनियन व दिल्ली राज्य पक्ष कार्यालय या संयुक्त प्रकल्पाच्या 'मेजर जयपाल सिंह भवन' या नवनिर्मित इमारतीच्या पायाभरणीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सीपीआय(एम)च्या वरिष्ठ नेत्या कॉ. वृंदा करात यांच्या हस्ते पायाभरणी करण्यात आली. कार्यक्रमाला सीपीआय(एम)चे महासचिव कॉ. एम.ए. बेबी, केरळचे मुख्यमंत्री व पॉलिट ब्युरो सदस्य कॉ. पिनराई विजयन तसेच पक्षाचे केंद्रीय समिती सदस्य, ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नव्या भवनाच्या उभारणीमुळे किसान व शेतमजूर चळवळीचे राष्ट्रीय केंद्र बळकट होणार असून, दिल्लीतील पक्ष संघटनात्मक कार्याला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. किसान सभेचे नेते डॉ. अजीत नवले यांनी माहिती देताना सांगितले, मेजर जयपाल सिंह भवन हे शेतकरी, शेतमजूर व कामगार चळवळीच्या सशक्त एकतेचे प्रतीक ठरणार असून आगामी काळात संघर्ष व संघटनाचे केंद्र म्हणून उभे राहील.

## राजर्षी शाहू महाराज ग्रंथालयाचे लोकार्पण; नव्या सामाजिक हस्तक्षेपाला मिळाली दिशा

**बीड । रयत समाचार**



सम्राट प्रतिष्ठान संचलित राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक ग्रंथालयाचे लोकार्पण सोहळा नकताच उत्साहात पार पडला. या ग्रंथालयामुळे बीड जिल्ह्याच्या बौद्धिक आणि सामाजिक चळवळींना नव्या दिशेची चालना मिळणार असल्याचे मत धम्मसंगिनी रमा गोरख यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानवी हक्क अभियानचे नेते डॉ. मिलिंद आव्हाड होते, तर सम्राट प्रतिष्ठानचे प्रवर्तक केशव वाघमारे, बाळासाहेब जावळे, राहुल वाघमारे, सुभाष साळवे आदी मान्यवर उपस्थित होते. बीडमधील प्रतिष्ठानचे हितचिंतक व पाठीराखे यांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. यावेळी धम्मसंगिनी रमा गोरख यांनी सांगितले, आपले समविचारी, समकालीन दोस्त, कुशल कामास सुरूवात करत आहेत... आणि हे महाराष्ट्रभर घडत आहे. दिर्घ पल्ल्याच्या संघर्षासाठी निवडणुकीपलीकडील नव्या हस्तक्षेपाचे महत्त्व लोकांना उमगले आहे. आपली जबाबदारी ओळखून समाजपरीवर्तनाच्या वाटचालीत लोक निश्चितच पुढे येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ग्रंथालयाच्या माध्यमातून अभ्यास, संशोधन आणि सामाजिक प्रश्नांवरील संवादाची नवी दारे खुली झाली असून, राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा प्रकाश तरुणाईच्या वाटचालीला नवा वेग देईल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## ...आता शोरूममधेही मिळणार संघवस्त्र

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर

**जैनपूरा, कनोज । रयत समाचार**



देशातील हिंदूंच्या नावाने असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) आपल्या शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. अवघ्या १२ दिवसांनंतर येणारी विजयादशमी ही शताब्दी वर्षातील पहिली विजयादशमी ठरणार असून या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होणे ही संघ कार्यकर्त्यांसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. कधीकाळी संघाचा पारंपरिक गणवेश असलेली हाफचड्डी, शर्ट, दंड आदी केवळ संघाच्या कार्यालयांतच उपलब्ध होत असे. मात्र काळाच्या ओघात झालेल्या बदलाचे चित्र आज दिसून येत असून आता हा गणवेश मोठ्या शोरूममध्येही सहज उपलब्ध होतो. यामुळे संघाची वाढती लोकप्रियता आणि समाजातील सर्व घटकांना सोबत घेण्याचा प्रयत्न दिसत आहे. या शताब्दी वर्षात 'संपर्क, संवाद, संघटन आणि सेवा' या चार सूत्रांवर आधारित विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. अजूनही ज्यांच्यापर्यंत संघाचे कार्य पोहोचले नाही, त्यांच्याशी जोडणी करण्याचा हा नवा अध्याय असेल. या पार्श्वभूमीवर संघ कार्यकर्ते व समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून शताब्दी वर्षाचे हे पर्व संघाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी ऐतिहासिक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जातो.

## अखेर ओंकार गोव्यात; वनखात्याने लावला सापळा

**पणजी । रयत समाचार**

महाराष्ट्राच्या सीमेवरून गोव्याच्या हद्दीत शिरलेल्या 'ओंकार' नावाच्या हत्तीला पकडण्यासाठी वनखात्याने मोपा येथील वनक्षेत्रात सापळा लावण्यास सुरुवात केली आहे.

कळपापासून भरकटलेला हा हत्ती सध्या बिथरलेला असून, त्याला लवकरात लवकर पकडण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. काल सकाळपर्यंत हत्ती महाराष्ट्राच्या हद्दीतच असल्याचे सांगण्यात आले होते. मुख्य वनसंरक्षक नवीन कुमार यांनी सकाळीच हत्तीने तेरेखोल नदी



ओलांडली नसल्याने तो महाराष्ट्राच्या हद्दीतच असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र दुपारपर्यंतच्या घडामोडींमध्ये हा हत्ती गोव्यात शिरल्याचे निश्चित झाले. गोव्याचे वन पथक महाराष्ट्र वन विभागाशी सातत्याने संपर्कात असून, हत्तीच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कळपापासून वेगळा झाल्याने हत्ती बिथरलेला आहे. त्यामुळे कोणतीही घाईगडबडीची कृती धोकादायक ठरू शकते, असेही कुमार यांनी स्पष्ट केले. नागरिकांनी सतर्क राहावे, परंतु घाबरून न जाण्याचा सल्ला देताना मुख्य वनसंरक्षकांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. हत्ती दिसल्यास किंवा त्याच्या हालचालींबद्दल कोणतीही माहिती मिळाल्यास त्वरित वन विभागाला कळवावे, असेही त्यांनी सांगितले.

## महाराष्ट्राचा जीडीपी वाढतेय, पण समाज अधोगतीकडे? - पाटील

**मुंबई । रयत समाचार**



राज्याच्या जीडीपीचे वाढीचे आकडे जरी आश्वासक वाटत असले, तरी सामाजिक वास्तव मात्र काळजीचा विषय आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राजू तथा प्रमोद रतन पाटील यांनी केले. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी भारताच्या जीडीपी वाढीचा अंदाज १०.१% इतका आहे. काही राज्ये जसे की राजस्थान (१६.७%), सिक्कीम (२२%), उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार (१३%) हे देशाच्या सरासरीपेक्षा वेगाने वाढत आहेत.

मात्र, ही वाढ केवळ आकड्यांपुरती मर्यादित आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. कारण त्या राज्यांमध्ये जातीपातीचे राजकारण करणारे नेते जनतेला विभागतात. माध्यमे राजकारणाच्या चटकित गुंतलेली आहेत. तरुण सरकारी नोकरीच्या स्वप्नात अडकलेले आहेत. महागाईच्या झळा सहन करत सामान्य कुटुंब संघर्ष करत आहेत. प्रशासन भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले आहे. या सगळ्या घटकांमुळे सामाजिक अधोगती निश्चित आहे, आणि ती जीडीपीच्या आकड्यांनी झाकता येत नाही. महाराष्ट्रासारख्या राज्यात जीडीपी वाढ ९% असूनही, सामाजिक असंतुलन आणि प्रशासनातील भ्रष्टाचार यामुळे विकासाचा अर्थच गमावला जातो. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राजू तथा प्रमोद रतन पाटील यांचे विचार या पार्श्वभूमीवर अधिक महत्त्वाचे ठरतात. त्यांनी वारंवार सामाजिक समतेचा आणि प्रशासनिक पारदर्शकतेचा आग्रह धरला आहे.

## जात्यंतक लोकशाही क्रांतीचा संदेश देत कॉ. पाटील जन्मशताब्दी सांगता परिषद मुंबईत संपन्न

**मुंबई । रयत समाचार**




प्राच्यविद्यापंडित, सत्यशोधक व मार्क्सवादी विचारवंत कॉ. शरद पाटील यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाची राज्यव्यापी सांगता परिषद दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सर्वोच्च न्यायालयाच्या ज्येष्ठ वकिल अॅड. इंदिरा जयसिंग यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी भारतातील पहिल्या आदिवासी महिला कादंबरीकार कॉ. नजुबाई गावित होत्या. परिषदेसाठी राज्यभरातून डावे व परिवर्तनवादी विचारांचे अभ्यासक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. उद्घाटन प्रसंगी माकप महाराष्ट्राचे सरचिटणीस कॉ. अजित नवले, वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर, शे.का. पक्षाचे नेते राजू कोरडे आणि राष्ट्र सेवा दलाचे अध्यक्ष राजा कांदळकर आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात जनस्थान स्त्री राज्याची राणी श्रूपर्णखा यांच्या प्रतिमेचे अनावरण करून उद्घाटन सत्रास सुरुवात झाली. त्यानंतर झालेल्या परिसंवादात ''जात्यंतक लोकशाही क्रांती आणि कॉ. शरद पाटील यांचे योगदान'' या विषयावर डॉ. उमेश बगाडे यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा झाली. यात डॉ. प्रदीप गोखले (पुणे), डॉ. प्रमोदकुमार आदी विद्वानांनी मोलाचे विचार मांडले. सांस्कृतिक सत्रात राज्यभरातून आलेल्या विविध समूहांनी क्रांतीगीते व जागरगीते सादर केली. शाहीर संभाजी भगत यांनी सादर केलेल्या गीतांनी उपस्थितांना भारावून टाकले. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीतील कॉ. सिद्धार्थ जगदेव, किशोर जाधव, अंकुश कदम, तुषार सूर्यवंशी, विजय वाघ, दिपाली भालेराव यांच्यासह मुंबई युनिटमधील कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले. कॉ. शरद पाटील यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने झालेली ही सांगता परिषद राज्यातील परिवर्तनवादी चळवळींना नवा ऊर्जावान संदेश देऊन गेली.

# महंत भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन

## ग्रामगीतेतील तत्त्वांचे पालन करून अनुकरण करावे

**अहमदनगर । समीर मन्यार**

परमहंस श्री शंकर महाराज पिंपळखुटा, जिल्हा अमरावती यांच्या ८१ व्या प्रकट दिनानिमित्त, देहू येथून पिंपळखुटा येथे आणलेल्या जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या पादुकांचे परतीच्या प्रवासात श्रीक्षेत्र देवगड येथे महंत भास्करगिरी महाराजांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले. या पूजनप्रसंगी आळंदी येथील ह.भ.प. विठ्ठल महाराज गव्हाणे, माजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे, तसेच परिसरातील मोठ्या संख्येने उपस्थित भक्तगण सहभागी झाले होते. या वेळी बोलताना महंत भास्करगिरी महाराज म्हणाले की, वंदनीय तुकडोजी महाराजांनी लिहिलेली 'ग्रामगीता' सर्वांनी वाचावी, पारायण करावे. येणाऱ्या नवरात्र महोत्सवात विशेषतः महिला भगिनींनी यातील तत्त्वांचे अनुकरण करावे. ग्रामगीतेत सर्वधर्मसमभाव, एकोपा, शांतता, सकाळी ध्यान व संध्याकाळी प्रार्थना यावर भर देण्यात आला आहे.



या तत्त्वांचा अंगीकार केल्यास गावाची आणि समाजाची प्रगती निश्चित आहे. ते पुढे म्हणाले की, सध्याच्या काळात श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी डीजे आणि मिरवणुकांचा अतिरेक होतो आहे. खरे श्रेष्ठत्व हे विचारात, त्यागात, प्रेमात आणि कृतीतून येते. ग्रामगीतेतील विचारांचे अनुकरण करून गोसेवा, राष्ट्रसेवा, जलसंवर्धन, शेतीविकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले. भाऊसाहेब बऱ्हाटे म्हणाले की, नेवासा तालुक्यातील नवरात्र महोत्सवात ज्या गावांमध्ये ग्रामगीतेचे पारायण व ध्यान-प्रार्थना होतील, अशा प्रत्येक गावात एक ग्रामगीता आणि किमान २००० ध्यान-प्रार्थनेची पुस्तके वितरित केली जातील. ज्यांना ही पुस्तके हवी असतील त्यांनी २० सप्टेंबरपूर्वी संभाजीनगर रोडवरील घोडेगाव परिसरातील हॉटेल वृंदावन येथे संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. २२ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या नवरात्र उत्सवात ग्रामगीतेचे पारायण गावोगावी होऊन सर्व धर्मसमभावाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



# अपघाती मृत्यू प्रकरणी वारसांना एक कोटी रूपये भरपाई

## लोकन्यायालयामध्ये प्रकरण निकाली

**अहमदनगर । रयत समाचार**

कुटुंबप्रमुखाच्या अपघाती मृत्यूबद्दल वारसांना एक कोटी रुपयांची नुकसानभरपाई राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये मंजूर करण्यात आली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते वारसांना धनादेश प्रदान करण्यात आला. पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील अनिल शिवाजी भाकरे (वय ३६) हे टाकळी काझी (ता. नगर) येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. नगर-पाथर्डी रस्त्यावर ता.३१ ऑक्टोबर २०२२ रोजी हॉटेल सिद्धीविनायक येथे झालेल्या दुर्दैवी अपघातात त्यांचा मृत्यू झाला. मयत अनिल भाकरे यांच्या पश्चात पत्नी, वयोवृद्ध आई-वडील व दोन लहान मुले असा परिवार उरला.अनिल भाकरे यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबाने अ‍ॅड.मधुकर कोरडे यांच्या मार्फत येथील मोटार अपघात न्यायाधिकरणासमोर नुकसानभरपाईसाठी दावा दाखल केला. हा दावा चोलामंडलम एमएस जनरल विमा कंपनीविरुद्ध दाखल करण्यात आला होता.या प्रकरणात विमा कंपनीतर्फे अ‍ॅड.गिरीजा गांधी यांनी बचाव दाखल केला. या दुर्दैवी अपघातातील मयताच्या वारसांना जलद व योग्य नुकसानभरपाई मिळावी यासाठी अर्जदार व कंपनीच्या वकिलांनी प्रयत्न केले. नगर जिल्हा न्यायालयात आयोजित राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये अर्जदार व विमा कंपनीचे मॅनेजर विशाल गुप्ता व श्रद्धा पूर्णपात्रे यांनी वकिलांच्या समवेत चर्चा करून समन्वय साधला. अपघातातील मयताच्या वारसांना लोकन्यायालयामध्ये एक कोटी रुपयांची भरपाई देण्याचे मान्य करण्यात आले, तसा धनादेश देण्यात आला. जिल्हा न्यायाधीश के.एस. कुलकर्णी व अ‍ॅड.भूषण बहाटे यांच्या पॅनेलसमोर हे प्रकरण समोपचाराने निकाली काढण्यात आले. अ‍ॅड. सिद्धांत गांधी व अ‍ॅड. आरती सरोदे यांनी सहाय्य केले.

# अहमदनगर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय जीवन विज्ञान परिषद




**अहमदनगर । रयत समाचार**

जीवन विज्ञानातील नवनवीन शोध व नवकल्पनांना चालना देण्यासाठी अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर तर्फे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ''आंतरराष्ट्रीय परिषद जीवन विज्ञानातील अलीकडील शोध व नवकल्पना (-२०२५)'' या परिषदेला भारतासह अमेरिका, इटली, स्पेन, आयर्लंड या देशांतील ख्यातनाम शास्त्रज्ञ, संशोधक व उद्योग तज्ज्ञ उपस्थित राहणार असून, १८ व १९ सप्टेंबर रोजी हॉटेल अक्षय पॅलेस, अहिल्यानगर येथे हा भव्य कार्यक्रम पार पडणार आहे. या परिषदेतून आरोग्य, शेती, पर्यावरण व औद्योगिक विकास यामध्ये संशोधनाच्या नव्या संधींचा वेध घेतला जाणार आहे. डॉ. जयप्रकाश मुळीयिल (सी.एम.सी., वेल्लोर), डॉ. शार्मिला बापट (एन.सी.सी.एस., पुणे), डॉ. अरविंद नाटू (आय.आय.एस.ई.आर., पुणे), डॉ. राहुल भांबुरे व डॉ. सी. के. जॉन (एन.सी.एल., पुणे), डॉ. सुजीथ नीरक्कल (आयर्लंड), डॉ. क्रिस्तीना एलामेरो (स्पेन) यांच्यासह अमेरिका व भारतातील नामांकित संशोधक मार्गदर्शन करणार आहेत. विशेष म्हणजे या परिषदेचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ वैज्ञानिक व राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन भूषविणार असून, अमेरिकेतील डॉ. मनोहर फर्टाडो यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून संशोधन व ज्ञानाचा वारसा जपणाऱ्या अहमदनगर महाविद्यालयाने या परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व स्थानिक संशोधकांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. बी.पी.एच.ई. सोसायटीचे चेअरमन तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित होत आहे. या परिषदेमुळे नवनवीन संशोधनाला चालना मिळेल, तसेच जागतिक तज्ज्ञांचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत व शिक्षकांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. इच्छुक संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी दूरध्वनी क्रमांक ९८४५७ ०००५२ किंवा international.conference.2025@aca.edu.in वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




# नगरमधे केरळचीच अनुभूती- ब्रिगेडियर पी. कुमार

## सम्राट बळीराजाच्या स्मरणार्थ ओणम साजरा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगरातील केरला समाजम तर्फे वृंदावन लॉन्स येथे भव्य ओणम उत्सवाचे आयोजन करण्यात आले. दीपप्रज्वलन करून या उत्सवाचे उद्घाटन ब्रिगेडियर पी. सुनील कुमार (एसएम, कमांडंट, एमआयसी अँड एस) यांच्या हस्ते झाले. यावेळी लेफ्टनंट कर्नल अलेक्स डॅनियल, मेजर अभय शेणाय, मेजर निधी एम.एन., सब मेजर राजेश ए.व्ही., तसेच केरला समाजमचे बाबु टायरवाले, व्ही.पी. सुदर्शन, पी. सत्यन, वसंतसिंग, राजू लक्ष्मण, स्मिता बिजू, पी.सी. श्रीधर, कार्तिक नायर, सुरेश कुमार, सीएसआरडीचे डॉ.जेमोन वर्गीस, बाळासाहेब बोराटे आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना ब्रिगेडियर सुनील कुमार म्हणाले, मी एमआयआरसी येथे कार्यरत असल्याने बाहेर संपर्क कमी येतो, पण आज येथे आलेल्या वातावरणामुळे मला केरळमध्ये असल्याचा अनुभव आला. जिल्ह्यातील समाज बांधव एकत्र येऊन हा उत्सव साजरा करत आहेत, हे पाहून आनंद झाला. केरळमधील लोक जगभर उद्योग-व्यवसायासाठी स्थायिक झाले असून धर्मभेद न मानता ओणम हा सण एकत्र येऊन साजरा करतात, असेही त्यांनी नमूद केले. नगरमध्ये स्थायिक झालेली दक्षिण भारतीय मंडळी स्थानिक संस्कृतीत एकरूप झाली असून मराठी भाषा बोलण्यातही पारंगत आहेत. नगरच्या विकासात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी गौरविले. दिवाळीप्रमाणेच महत्त्वाचा मानला जाणारा हा सण वामनावतारातील बळीराजाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. जनतेवर प्रेम करणारा बळीराजा दरवर्षी दहा दिवसांसाठी पृथ्वीवर येतो, अशी परंपरा असून त्याच्या स्वागतासाठी फुलांच्या रांगोळ्या काढल्या जातात. संपूर्ण दिवसभर चाललेल्या उत्सवात चित्रकला स्पर्धा, फुलरांगोळी स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य-ऑर्केस्ट्रा यांसह विविध उपक्रम राबविण्यात आले. पारंपरिक पद्धतीने सतरंजण भोजन केळीच्या पानावर देण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केरला समाजमच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. उत्सवाचे वातावरण केरळच्या सणोत्सवाचीच अनुभूती देणारे ठरले.




# कोतवालीसमोरील आदर्श शाळेजवळ स्पिडब्रेकरची मागणी

## अपघात टळला अन् नागरिक झाले सावध

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील कोतवाली पोलिस स्टेशनसमोरील महानगरपालिकेच्या 'आदर्श शाळे'समोर तातडीने स्पीडब्रेकर बसवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. काल ता. १३ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता शाळा सुटल्यावेळी एका विद्यार्थीनीवर दुचाकी धडकणार होती. सुदैवाने मोठा अपघात टळला, मात्र या घटनेनंतर नागरिकांनी प्रशासनाला जागे करण्यासाठी आवाज उठवला आहे. नुकताच माणिक चौक ते आशा टॉकीज या मार्गाचा रस्ता काँक्रीट करण्यात आला आहे. रस्ता गुळगुळीत व चांगला झाल्याने दुचाकी व चारचाकी वाहनधारक वेगाने वाहने पळवत असल्याचे दिसते. याच मार्गावर असलेल्या आदर्श शाळेत (सध्या चाँद सुलताना हायस्कूलची प्राथमिक शाळा) पहिली ते चौथीपर्यंतचे विद्यार्थी शिकतात. शाळा सुटल्यावर लहान मुले धावत बाहेर पडतात, त्याच वेळी वेगात येणारी वाहने धोक्याचे कारण ठरत आहे. या पार्श्वभूमीवर असिफखान दुलेखान यांच्यासह परिसरातील सजग नागरिकांनी, मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने शाळेसमोर स्पीडब्रेकर बसवून वाहतुकीवर नियंत्रण आणावे, अशी मागणी केली आहे. महानगरपालिका बांधकाम विभागाने या तातडीच्या प्रश्नावर त्वरीत उपाययोजना करून विद्यार्थ्यांचा जीव धोक्यातून वाचवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट'; नागरिकांनी घ्यावी विशेष दक्षता

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार दिनांक १४ व १५ सप्टेंबर २०२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यासह पुणे व नाशिक जिल्ह्यांमध्ये वीजांचा कडकडाट, जोरदार वारे व मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी करून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. नद्यांच्या विसर्गात वाढ; पूरस्थितीचा धोका पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढला असून त्यामुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. सध्या भिमा नदीवर दौंड पूल येथे ४,३७६ क्युसेक, गोदावरी नदीवरील नांदूर मध्यमेश्वर धरणातून १,६१४ क्युसेक व जायकवाडी धरणातून ५६,५९२ क्युसेक, प्रवरा नदीवरील भंडारदरा धरणातून ८२० क्युसेक व निळवंडे धरणातून ७०० क्युसेक, मुळा धरणातून ५०० क्युसेक तर कुकडी नदीवरील येडगाव धरणातून ७५० क्युसेक इतका विसर्ग सुरू आहे. प्रशासनाकडून नागरिकांना सूचना मेघगर्जना होत असताना झाडाखाली, टॉवर, ध्वजांचे खांब किंवा धोकादायक ठिकाणी उभे राहू नये. विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी पाणीपातळी वाढल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. पाण्याने भरलेले पूल ओलांडू नयेत. मोकळ्या जागी असल्यास गुडघ्यावर बसून डोके झाकून घ्यावे. जनावरांचे स्थलांतर सुरक्षित ठिकाणी करावे व शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी नियोजन करावे. पर्यटनासाठी धरणे, नद्या व धबधब्यांच्या परिसरात जाणे टाळावे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रांमध्ये पाण्याच्या प्रवाहाजवळ जाण्याचे टाळावे. आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल-फ्री क्रमांक १०७७ असून दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३८४४ व २३५६९४० उपलब्ध आहेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# भगवान वराहांच्या वारसांसाठी वराहशाला निर्माण कराव्यात - देवढे

**नितीन गटाणी । पाथर्डी**

श्री विष्णूंचे तिसरे अवतार भगवान वराहांच्या वारसांची सध्या खूपच अवहेलना होत आहे. त्यामुळे, त्यांच्या निवासासाठी वराहशाला निर्माण करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र देवढे यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केलेल्या निवेदनात देवढे यांनी म्हटले आहे की, काही काळापूर्वी केवळ शहरांसाठी उपद्रवी ठरत असलेल्या या अवतारी प्राण्याचा उपद्रव आता ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनाही होऊ लागला आहे. ज्या शेतकऱ्यांची क्रयशक्ती सुदृढ आहे त्यांनी यथाशक्ती शेतांना कुंपण घातले आहे. या कुंपणाचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्यामुळे ज्यांची कुंपण घालण्याची ऐपत नाही, त्या गरीब शेतकऱ्यांची पिके वराहदेवता फस्त करत आहेत. हा सारा सत्यानाश शेतकऱ्यांना डोळ्यादेखत पाहावा लागतो. कारण, हुसकावण्याचा प्रयत्न केला तर वराहदेवता शेतकऱ्यांवर जीवघेणा हल्ला करतात. पूर्वी फक्त शहरांत वास्तव्यास असलेल्या वराहदेवता प्रथम शहरांलगत असलेल्या खेड्यांत स्थलांतरीत झाल्या. असं करताकरता या वराहदेवता आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या आहेत. भगवान श्री विष्णूंचा हा तिसरा अवतार भारतावर इतका प्रसन्न झाला आहे की,



असं एकही खेडेगाव नाही तिथं भगवान वराहांचा प्रतिनिधी नाही. या अवताराला लोकाभिमुख करणाऱ्या आमदार नितेश राणे यांनी भगवान वराह जयंती साजरी करण्याचे आवाहन केल्यानंतर नवीन पिढीला हे ज्ञात झाले की, वराह (डुक्कर) भगवान विष्णूंचा तिसरा अवतार आहे. जर नवहिंदुत्ववादी आमदार नितेश राणे यांनी हे आवाहन केलं नसतं तर या अवतारश्रेष्ठाला प्राणीमात्रांमध्ये सर्वाधिक उपेक्षितांचं जीवन जगावं लागलं असतं. त्यामुळे, नवहिंदुत्ववादी आमदार नितेश राणे यांचा समग्र महाराष्ट्र व गायपट्टा आभारी आहे. स्वयंघोषित अजैविक पंतप्रधानांच्या हिंदू धर्मावरील प्रगाढ निष्ठेमुळे अनेक लोकांना वराहांची पूजा करण्याचा ध्यास लागला आहे. म्हणूनच वसुबारसदिनासारखा एखादा वराहबारसदिन साजरा करण्याची विनंती आपण आमच्या वतीने केंद्रसरकारला करावी. देवढे यांनी पुढे म्हटले आहे की, गाय हा उपयुक्त पशु आहे, असं ठाम प्रतिपादन करणाऱ्या विनायक दामोदर सावरकरांकडे दुर्लक्ष करून गायीला गोमातेचा दर्जा दिला गेला. परंतु वराह- अर्थात डुक्कर हा भगवान श्री विष्णूंचा तिसरा अवतार असूनही त्याची मात्र अक्षम्य अवहेलना होत आहे. म्हणूनच त्यांच्या वाली वारसांसाठी वराहशाला उभाराव्यात अशी जनभावना आहे. हिंदू धर्मावर प्राणापेक्षाही जास्त प्रेम करणाऱ्या पंतप्रधानांनी यासाठी पुढाकार घ्यावा, अशी सर्व हिंदूंची इच्छा आहे. त्यामुळे, भगवान श्री विष्णूंच्या अवताराचं प्रतिनिधित्व करणारी प्रजातीही सुरक्षित होईल, अपघातही टळतील आणि शेतकऱ्यांचं भलंही होईल. पौराणिक इतिहास पाहता या अवताराचे पृथ्वीवर फार मोठे उपकार आहेत. हिरण्याक्ष नावाच्या राक्षसाने जेव्हा पृथ्वीला पाण्यात बुडवलं तेव्हा भगवान श्री विष्णूंनी वराह अवतार धारण करून पृथ्वीचं रक्षण केलं होतं, असं पुराणात म्हटलं आहे. त्यामुळे या अवताराचं प्रतिनिधित्व करणाऱ्या डुक्करांच्या संवर्धनासाठी वराहशाला स्थापन करण्यात याव्यात, अशी तमाम हिंदू बांधवांच्या वतीने देवढे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना प्रातिनिधिक विनंती केली आहे.



# हनुमान वस्ती शाळेत शिक्षकांचा निरोप समारंभ; विद्यार्थ्यांना अश्रू अनावर

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हनुमान वस्ती (जोहरापूर) येथे कार्यरत असलेल्या श्रीमती वैशाली गव्हाणे मॅडम व श्री शिवाजी देशमुख सर या दोन्ही शिक्षकांचा शासन नियमानुसार बदली आदेश लागल्याने त्यांना शालेय परिसरात आयोजित निरोप समारंभात अश्रुपूर्ण निरोप देण्यात आला. सदर कार्यक्रमात गावकऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी दोन्ही शिक्षकांचा सत्कार केला असता उपस्थित सर्वांच्या डोळ्यांत पाणी आले. सलग पाच वर्षांच्या सेवाकाळात गव्हाणे मॅडम व देशमुख सर यांनी गावातील सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला होता. हागणदारी मुक्ती अभियान, बालविवाह प्रतिबंध, मुलींचे शिक्षण, व्यसनमुक्ती, तसेच शाळेची शैक्षणिक गुणवत्ता टिकविण्याचे प्रयत्न या कार्याला ग्रामस्थांनी विशेष उजाळा दिला. मनोगत व्यक्त करताना गव्हाणे मॅडम व देशमुख सर म्हणाले की, ''हनुमान वस्ती व जोहरापूर येथील ग्रामस्थांनी सदैव आदराची वागणूक दिली. शाळेसाठी गावकऱ्यांनी दिलेले सहकार्य अविस्मरणीय आहे. गावातील नागरिकांनी एकोप्याने राहावे, व्यसनापासून दूर रहावे व शाळेच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे,'' असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमात नवीन रुजू झालेले शिक्षक श्रीमती सोनवणे मॅडम व धरम सर यांचेही स्वागत करण्यात आले. शेवटी निरोपाचा क्षण आल्यानंतर लहानग्या विद्यार्थ्यांना हुंदके आवरले नाहीत व शाळेचे वातावरण क्षणभर भारावून गेले. या कार्यक्रमाला सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तसेच हनुमान वस्ती, जोहरापूर, लोळेगाव परिसरातील महिला-पुरुष व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पायी दिंडी वारी खर्चात मोठा घोटाळा; संभाजी ब्रिगेडचा आरोप



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

पंढरपूर पायी दिंडी वारीसाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र या निधीच्या खर्चात प्रचंड गैरव्यवहार, अपहार आणि भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले आहे. यामध्ये ज्यांच्याकडून चौकशी व कारवाई होणे अपेक्षित आहे, त्यांच्याच हात भ्रष्टाचाराने बरबटलेले असल्याने सर्वसामान्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संभाजी ब्रिगेडने या घोटाळ्याचे ठोस पुरावे गोळा केले असून येत्या सोमवारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांची भेट घेऊन अधिकृत तक्रार व सर्व पुरावे सादर करण्यात येणार आहेत. या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच गुन्हे दाखल करून जबाबदार अधिकाऱ्यांवरही खटले चालविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात येणार आहे. ''शासनाचा निधी हा जनतेच्या करातून जमा होतो. तो पैसा समाजहितासाठी वापरला जाण्याऐवजी भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या खिशात गेला, तर जनता गप्प बसणार नाही. पायी दिंडी वारी ही भक्तीची, परंपरेची व श्रद्धेची वाटचाल आहे. त्या पवित्रतेवर भ्रष्टाचाराचा डाग लावणाऱ्यांना कडक शिक्षा झालीच पाहिजे,'' अशी ठाम भूमिका संभाजी ब्रिगेडने घेतली आहे. सोमवारी जिल्हा परिषदेला भेट दिल्यानंतर पुढील लढ्याची दिशा जाहीर केली जाईल, असे तालुका अध्यक्ष श्यामभाऊ जरे यांनी सांगितले.



# वांजोळी शाळेत शिक्षकांचा निरोप व स्वागत समारंभ संपन्न

**नेवासा । रयत समाचार**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वांजोळी (केंद्र शिंगवे तुकाई) येथे शुक्रवारी, ता. १२ सप्टेंबर रोजी बदली झालेल्या शिक्षकांचा निरोप समारंभ व नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. माजी कुलगुरू काशिनाथ पटारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चेअरमन विजयाताई काळे, सरपंच आप्पासाहेब खंडागळे, पोलिस पाटील अर्चना दाणी आदी मान्यवर उपस्थित होते. निरोप समारंभातील सत्कारमूर्ती म्हणून रेखा बाजीराव काळे, संगीता मोहन बनकर व संतोष सुभाष धामणे यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. तर नव्याने रुजू झालेल्या पुष्पलता जोशी, भिमाबाई भिसे, ललिता गेरंगे व मनीषा सातपुते यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका मंदा निमसे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. साठे यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमती कानगुडे यांनी केले. या कार्यक्रमास पांडुरंग खंडागळे, चंद्रकांत खंडागळे, गोरक्षनाथ गुरगुडे, शारदा मोकाटे, कारभारी खंडागळे, बहिरु खंडागळे, व्यवस्थापन समिती अध्यक्षा योगिता ढमढेरे, सय्यद, केंद्रप्रमुख नामदेव दहातोंडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिबट्याच्या दहशतीने नागरिक हैरान; लोकप्रतिनिधींचे मौन

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव नगरपालिका हद्दीतील टाळकी फाटा परिसरात बिबट्याच्या दहशतीने नागरिक भयभीत झाले असून, शालेय विद्यार्थी व सामान्य नागरिकांना भीतीच्या छायेत वावरावे लागत आहे. काटेरी झुडपांमध्ये दबा धरून बसणाऱ्या बिबट्यामुळे सततचा धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. त्यांनी वनाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देत सांगितले की, टाळकी फाटा परिसरासह नगरपालिकेच्या हद्दीत पिंजरे लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा तसेच परिसरातील काटेरी झुडपे तात्काळ हटवून नागरिकांना सुरक्षित वातावरण द्यावे. गेल्या काही महिन्यांत मतदारसंघातील विविध भागांत बिबट्याच्या हल्यात नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. लोकप्रतिनिधी आमदार काळे मात्र मौन असून ठोस भूमिका घेत नाहीत, अशी नागरिकांची भावना आहे.

त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. अंधार झाल्यानंतर घराबाहेर पडायलाही लोकांना भीती वाटत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत स्नेहलता कोल्हे यांनी केलेली ही मागणी सर्वसामान्यांच्या हिताची असल्याचे सांगून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# राज्यात विरोधी पक्षाची भूमिका वंचित बहुजन आघाडीच बजावत आहे- प्रा. चव्हाण

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

राज्यात सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्षच ठेवला नाही जे विरोधी बाकावर आहेत ते फक्त नौटंकी करत असून त्यांना त्यांच्या संस्था वाचावायच्या असल्याने सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आवाज उठवत नसल्याचे दिसत आहे त्यामुळे आज सत्ताधारी आणि मुजोर झालेलं प्रशासन यांच्या विरोधात रस्त्यावर येऊन सर्वसामान्यसाठी वंचित बहुजन आघाडीच लढत आहे त्यामुळे यापुढे वंचिताचे प्रश्न आपल्याला सोडवायचे आहेत त्यासाठी गावागावातून स्वाभिमानी कार्यकर्त्यांची फौज उभी करणार असे वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा किसन चव्हाण म्हणाले ते काल शेवगाव येथिल ममता लॉन्स येथे तालुका आढावा बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष योगेश साठे हे होते. यावेळी बोलतांना प्रा. चव्हाण म्हणाले की येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आपल्याला ताकतीने लढवायच्या आहेत त्यासाठी त्याच्याही तयारीला लागा या आढावा बैठकीला जिल्हा उपाध्यक्ष कल्याण भागवत, शाहूराव खंडागळे, अरुण झांबरे, पाथर्डी चे तालुका अध्यक्ष पप्पूशेठ बोर्डे, ओमप्रकाश ससाणे, रवींद्र निळ, अरुण खर्चन, सुंदर आल्हाट, देवदान कांबळे, दादासाहेब गाडे, प्रमोद गजभिव, भारत मिसाळ, विष्णू वाघमारे, अशोक बिडे आदी पदाधिकारी उपस्थित होते यावेळी अनेक तरुण कार्यकर्त्यांनी तसेच मुस्लिम महिलांनीही पक्षात प्रवेश केला बैठकीचे प्रास्ताविक तालुका अध्यक्ष प्यारेलाल शेख यांनी तर आभार युवा अध्यक्ष ऑगस्टीन गजभिव यांनी मानले.

## डॉ. आंबेडकर परिनिर्वाण भूमी सन्मान

# कार्यक्रम समिती जिल्हा उपाध्यक्षपदी रावसाहेब घोडके

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व संविधान प्रचारासाठी दीर्घकाळ कार्यरत असलेले रावसाहेब घोडके यांची नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिनिर्वाण भूमी सन्मान कार्यक्रम समिती, नवी दिल्लीच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष इंद्रेश गजभिये यांच्या आदेशानुसार, समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. पाटबंधारे खात्यात ३७ वर्ष सेवा करून २०१८ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर घोडके यांनी संविधानाचे महत्त्व, सामाजिक समता व महामानवांचे विचार गावोगावी पोहोचविण्याचा ध्यास घेतला. सायकलवर संविधानाची प्रस्तावना व पर्यावरण संदेश घेऊन जनजागृती करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. या संघर्षशील व विचारनिष्ठ कार्याची दखल घेऊन त्यांना ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



या नियुक्तीबद्दल देशभरातून घोडके यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले, अर्जुन मेघवाल, बबनराव घोलप यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले. ''महापुरुषांचे विचार गावोगावी पोहोचविण्याचे माझे कार्य अखंड सुरू राहील. ही निवड माझ्यासाठी केवळ सन्मान नाही, तर मोठी जबाबदारी आहे,'' असे घोडके यांनी सांगितले.

# महामंडळे शासकीय समित्या नियुक्त्या रखडल्या आता मुहूर्त नवीन वर्षाचा.... कार्यकर्त्यांचा हिरेमोड

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

विविध महामंडळे आणि शासकीय समित्यांवरील सदस्यांच्या नेमणुका रखडल्या आहेत. त्यासाठी आता नवीन वर्षाच्या मुहूर्त सापडणार आहे. नियुक्त रखडल्याने कार्यकर्त्यांचा मात्र मोठ्या प्रमाणात हिरमोड झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अजित दादा पवार या महायुतीच्या सरकारने गेल्या दोन महिन्यापूर्वी महामंडळे आणि विविध शासकीय समित्यांवरच्या नियुक्ती या करण्याचा इरादा केला होता. मात्र दिवसा मागून दिवस निघून गेल्यानंतर अद्यापही आणि सध्या निवडणुका लागल्यामुळे महाविकास आघाडीचे कार्यकर्त्यांना खुश करण्याचे स्वप्न भंगले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अगोदर महामंडळे आणि विविध शासकीय समित्यांवरच्या नियुक्ती करून महाविकास आघाडीला राजकारणावरची आपली पकड अधिक घट्ट करता आली असती मात्र समन्वयाअभावी या निवडणुका न झाल्याने कार्यकर्त्यांच्या रोशास आता त्यांना सामोरे जावे लागणार आहे. काँग्रेस राजवटीत या महामंडळ आणि शासकीय समित्यांवरच्या नियुक्त्या मुद्दामहून रखडविल्या जात होत्या.

कार्यकर्त्यांकडून अनेक निवडणुका त्यांची कामे करून घेतली जात असताना त्यांना महामंडळे तसेच शासकीय समित्यांची पदे देण्यासंदर्भातली गाजर दाखविण्यात येत होती. सध्या महाविकास आघाडीतही काही नेते आणि पुढाऱ्यांना तसेच कार्यकर्त्यांना गाजर दाखवण्यात येत असल्याबाबत नाराजी पसरली आहे. अवधी आणि मुहूर्त अशा दोन्हीही बाबी जुळून येत असताना महाविकास आघाडीने मात्र या नियुक्त्या रखडवील्या आहेत. भारतीय जनता पक्षाने गेल्या अनेक वर्षानंतर प्रथमतः पक्षाच्या मुख्यमंत्री दिला आहे. पक्षाच्या नेते कार्यकर्त्यांना न्याय देण्याची संधी असतानाही मात्र वेळ काढून पणा झाल्याने या नियुक्त्या रखडल्या आहेत. आज होईल उद्या होईल असे करता करता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागल्यामुळे आता या न्यूटन साठी नवीन वर्षाची वाट पहावी लागणार आहे.

# इलेक्ट्रिकल असोसिएशन संचालकपदी संदीप लोंढे

**नेवासा । विजय खंडागळे**



इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अहिल्यानगर विभागाच्या अटीतटीच्या निवडणुकीत युवा व उदयोन्मुख कार्यकर्ते संदीप बाळासाहेब लोंढे यांनी ८० पेक्षा अधिक मतांच्या फरकाने विजय मिळवत संचालक पदावर निवड मिळवली. संदीप लोंढे हे सोनई येथील असून, प्रॉम्प्ट इलेक्ट्रिकल्स अ‍ॅण्ड कॉन्ट्रॅक्टर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी विश्वास पॅनल मधून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या निवडणुकीत विश्वास पॅनलचा दणदणीत विजय झाला. संदीप लोंढे यांच्या या विजयाबद्दल अहिल्यानगर विभागाचे मार्गदर्शक उमेश रेखे, माजी मंत्री शंकरराव गडाख, जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम समिती सभापती सुनील गडाख, तसेच असोसिएशनमधील अनेक पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.यावेळी नवनिर्वाचित संचालक संदीप लोंढे म्हणाले, ''सभासदांनी 'विश्वास पॅनल'वर जो विश्वास दाखवला आहे, त्याचे पूर्ण मूल्य राखत संघटनेच्या सर्वांगीण विकासासाठी व विविध प्रश्नांसाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे.''

# अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती.



या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# गावची जमीन गावातच राहणार मोरवणे ग्रामसभेत ऐतिहासिक ठराव

## परगावाच्या लोकांना जमीन विक्रीस बंदी




**चिपळूण । रयत समाचार**

कोकणातील वाढत्या बांधकाम व्यवसायामुळे आणि गुंतवणूकदारांच्या ओघामुळे गावोगावी स्थानिक शेती-जमिनी बाहेरच्या लोकांच्या ताब्यात जात आहेत. यामुळे गावच्या मूळ रहिवाशांच्या हातची जमीन सरकण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर चिपळूण तालुक्यातील मोरवणे ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत गावकऱ्यांनी एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक ठराव एकमुखाने मंजूर केला. या ठरावानुसार, गावातील जमीन गावाबाहेरील अथवा परजिल्ह्यातील लोकांना विकता येणार नाही. एखाद्या कुटुंबाला खरी गरज भासल्यास, ती जमीन फक्त गावातील नागरिकांनाच विकावी लागेल. गेल्या काही वर्षांपासून कोकणातील गावे हे परगावीय व परप्रांतीय लोकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. चांगले हवामान, निसर्गरम्य वातावरण आणि परवडणाऱ्या दरात जमीन उपलब्ध असल्याने बाहेरील लोकांनी कोकणात मोठ्या प्रमाणावर जमिनी खरेदी केल्या आहेत. या प्रक्रियेमुळे स्थानिकांच्या भविष्यातील पिढ्यांसाठी जमीन उपलब्ध राहणार नाही, अशी चिंता वारंवार व्यक्त केली जात होती. मोरवणे ग्रामसभेच्या ठरावामुळे मात्र या व्यवहारांवर आळा बसणार असल्याचे चित्र आहे. ग्रामसभेत गावकऱ्यांनी मते मांडताना सांगितले की, ''जमिनी गावकऱ्यांच्या हक्कासाठी राखीव राहिल्या पाहिजेत. बाहेरचे लोक पैसे देऊन जमीन खरेदी करतात, मात्र त्यातून गावाचा सामाजिक समतोल बिघडतो. स्थानिक तरुणांना शेती, घरे बांधण्यासाठी जागा उरत नाही. म्हणून हा ठराव आवश्यक आहे.'' ग्रामसभेतील चर्चेनंतर हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. हा ठराव कायदेशीर बंधनकारक नसला तरी गावासाठी तो सामाजिक बंधन ठरणार आहे. ग्रामस्थांनी पुढे जाऊन ठरावाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. कोणीही गावाबाहेरील व्यक्तीस जमीन विकण्याचा प्रयत्न केल्यास ग्रामसभा त्याविरोधात उभी राहील, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. मोरवणे ग्रामसभेचा निर्णय हा केवळ एक ठराव नसून गावाच्या एकात्मतेचा आणि भविष्याच्या दृष्टीने दूरदृष्टीचा पुरावा मानला जात आहे. यामुळे गावकऱ्यांचे हक्क अबाधित राहतील आणि भविष्यातील पिढ्यांना शेती व घरजमिनींचा तुटवडा भासणार नाही. या निर्णयामुळे परिसरातील इतर गावांसाठीही हा ठराव आदर्श ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मोरवणे ग्रामसभेच्या या निर्णयामुळे ''गावची जमीन गावातच'' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचा मार्ग मोकळा झाला असून, स्थानिक स्वाभिमानाचे हे एक भक्कम पाऊल मानले जात आहे.

# पैगंबर जयंतीनिमित्त पटेल स्पेशालिटी क्लिनिकतर्फे आरोग्य तपासणी शिबिर

**अहमदनगर । आबीद खान**

शहरातील कोटला स्टँडजवळील इंगळे मेडिकल शेजारी असलेल्या पटेल स्पेशालिटी क्लिनिक तर्फे पैगंबर जयंतीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात थायरॉईड, तीन महिन्यांची रक्तातील साखर (HbA1c), चरबी तपासणी (Lipid Profile) तसेच शुगर तपासणी नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. अशफाक पटेल यांनी दिली. हे शिबिर सोमवार, १५ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.०० या वेळेत होणार असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पटेल स्पेशालिटी क्लिनिकच्यावतीने करण्यात आले आहे. या शिबिराचे मार्गदर्शन सुप्रसिद्ध फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट व हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अशफाक पटेल (M.B.B.S., M.D. Medicine) करणार आहेत. त्यांनी एम.बी.बी.एस. (के.ई.एम. मुंबई), एम.डी. मेडिसिन (एस.के.एन. पुणे) यासह युनायटेड किंगडम, नवी दिल्ली व न्यूयॉर्क येथे डायबेटीस, हृदयरोग, जेरियाट्रिक मेडिसिन आणि इतर विषयात उच्च शिक्षण घेतले असून गुंतागुंतीच्या हृदयविकार तसेच डायबेटीस व्यवस्थापनाचा दांडगा अनुभव आहे. आरोग्य तपासण्या महागड्या असल्यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर निदान मिळत नाही. अशा वेळी या मोफत तपासणी शिबिराचा सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. थायरॉईड, रक्तातील साखर व चरबी तपासण्या हृदयरोग, मधुमेह व इतर गंभीर आजारांचे निदान करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. अधिक माहितीसाठी संपर्क :


पटेल स्पेशालिटी क्लिनिक ९२७२५५५७५८ / ९६२३३१६११२.

# गोवा मुक्तीपासून शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आयुष्य अर्पण

## स्वातंत्र्यसैनिक कॉ. सय्यद करिमोद्दिन

**सिल्लोड । रयत समाचार**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व स्वातंत्र्यसैनिक कॉम्रेड सय्यद करिमोद्दिन हे सिल्लोड तालुक्यातील लोकआंदोलनांचे प्रेरणास्थान होते. त्यांनी गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्र लढाई यामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. मराठवाड्यात भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले कार्य आजही अनुकरणीय मानले जाते. सिल्लोड शहराचा मुख्य रस्ता व बाजारपेठ उभारण्यामागे त्यांचे मोलाचे योगदान आहे. न्याय व हक्कासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. दीर्घ काळ तुरुंगात राहूनही त्यांनी आपला संघर्ष सुरूच ठेवला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून त्यांनी मोठमोठ्या लढ्यांचे नेतृत्व करून जनतेला न्याय मिळवून दिला. त्यांच्या कार्यामुळे सिल्लोडसह संपूर्ण मराठवाड्यात शेतकरी, कामगार व सामान्य नागरिकांमधे जागृती निर्माण झाली.



''जनतेच्या न्यायासाठी संघर्ष'' हेच त्यांच्या आयुष्याचे ब्रीद होते. आज त्यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांचा नातू कॉ. अनिस सय्यद यांनी सांगितले की, मी माझ्या आजोबांच्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न करत आहे. जनतेसाठी लढणे हेच आमच्या कुटुंबाचे ध्येय आहे. कॉम्रेड सय्यद करिमोद्दिन यांच्या आयुष्याचा आदर्श म्हणजे प्रामाणिक लढा, त्याग व समतेसाठी सातत्याने केलेले योगदान होय.

# निवृत्त समाजकल्याण अधिकारी प्र.ह. शितोळे यांचे निधन

## ॲड. रविंद्र शितोळे यांना पितृ:शोक



**अहमदनगर । रयत समाचार**

निवृत्त समाजकल्याण विभाग अतिरिक्त संचालक प्रल्हादराव हणमंतराव शितोळे यांचे ता. १३ सप्टेंबर २०२५ रोजी अल्पशः आजाराने निधन झाले. ते ॲड. रविंद्र शितोळे यांचे वडील होत. त्यांचा अंत्यविधी रविवारी ता. १४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता नालेगाव अमरधाम, अहमदनगर येथे झाला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

आदरांजली वाहताना निवृत्त समाजकल्याण अधिकारी रफिक मुन्शी म्हणाले, सामाजिक न्याय विभागात असणारे अभ्यासु, प्रामाणिक, नाविन्यपूर्ण योजना प्रस्तावित करून राबविणारे व्यक्तिमत्व म्हणजे शितोळे साहेब. त्यांनी तत्वावर कधीही तडजोड केली नाही, स्पष्टवक्ते, कठोर परिश्रम, शासन निर्णय तोंडपाठ असणारे आदरयुक्त ''साहेब'' विशेषतः वरिष्ठ अधिकारीवर्गासुद्धा शासन निर्णय लोकाभिमुख कसा राहील, त्यातील अटी शर्ती सुलभ होऊन अधिक, अधिक लोकांना लाभ कसा देता येईल याचे मार्गदर्शन करणारे, अधिकारी वर्गाचे मार्गदर्शक तसेच चारित्र्यसंपन्न, प्रामाणिक आणि कडक शिस्तीचे असल्याने विभागात आदरयुक्त दरारा होता. आम्हाला त्यांचे सोबतचे अनुभव, त्यांची भाषणे, त्यांचे मार्गदर्शन सतत अधिकारी म्हणून काम करीत असताना वेळोवेळी दिशादर्शक ठरत होते. एक दिशा देणारा दीपस्तंभ काळाच्या पडद्याआड गेला याचे दुःख आहे.

# दशावतार : परंपरेचा गंध, लोककलेची ताकद

मराठी चित्रपटसृष्टीने नेहमीच लोककला, परंपरा आणि ग्रामीण संस्कृती यांना आपल्याकडे सामावून घेतलं आहे. दशावतार हा चित्रपट त्याच प्रवाहातील परंतु वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवणारा आहे. कोकणातील लोकप्रिय लोकनाट्यप्रकार दशावतार हा इथे केवळ कलाप्रकार म्हणून दाखवलेला नाही, तर श्रद्धा, नैतिकता आणि समाजजीवनाशी नातं सांगणारा जिवंत वारसा म्हणून उलगडला आहे. कथानकाचा गाभा बाबुली मिस्त्री (दिलीप प्रभावळकर) या दशावतारी नटाभोवती फिरतो. आयुष्य कलेला अर्पण केलेला हा कलाकार वयोमानामुळे दुर्बल झाला आहे; तरीही अवतारधारणेच्या ओढीपासून तो दूर जाऊ शकत नाही. प्रभावळकरांनी बाबुलीच्या डोळ्यांतली आसक्ती, संवादातील जिद्द आणि रंगमंचावर उलगडणारा रुद्रावतार इतक्या ताकदीने साकारला आहे की प्रेक्षक भारावून जातात. त्यांचा मुलगा माधव (सिद्धार्थ मेनन) पित्याच्या हट्टाला तर्कशुद्ध प्रतिसाद देतो. काळजी, राग, प्रेम आणि असमंजसपणा यांचा संगम त्याच्या भूमिकेत दिसतो. काही ठिकाणी गती मंदावते, तरी पितापुत्र नात्याचा भावनिक ताण दोघांनीही प्रामाणिकपणे व्यक्त केला आहे. इन्स्पेक्टर मायकेल डोकोस्टा (महेश मांजरेकर) गावातील गडद वास्तव आणि सत्तेचं प्रतिनिधित्व करतो. त्यांच्या आवाजातली धार आणि देहबोली चित्रपटाला वेगळं टोक देतात. लक्ष्मण वाडेकर (भरत जाधव) नेहमीच्या विनोदी छटेत रंग भरतो; तर वंदना (प्रियदर्शनी इंदलकर) ग्रामीण स्त्रीजीवनाचा सच्चा स्पर्श देते. आबा तांडेल (रवी काळे) यांचा भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा ठसा जाणवतो. मॉंटी सरमळकर (अभिनय बेर्डे), मंत्री अशोक सरमळकर (विजय केंकरे) आणि पोलीस पाटील परब (सुनील तावडे) यांनी आपापल्या भूमिकेने लक्ष वेधलं आहे. याशिवाय, स्थानिक कलाकारांनी साकारलेले अवतार नाट्यविशेष उल्लेखनीय आहेत. उदा. नरसिंह, वामन, वराह, राम-रावण युद्ध, तसेच मत्स्यावताराच्या प्रसंगांमध्ये स्थानिक रंगकर्मींचा अभिनय आणि नृत्यशैली प्रेक्षकांना खऱ्या लोकनाट्याचा अनुभव देतात. त्यांचा सच्चेपणा हा चित्रपटाचा प्राण आहे. दिग्दर्शक सुबोध खानोलकर यांनी लोकनाट्याची परंपरा आणि आधुनिक संघर्ष यांची सांगड उत्तम घातली आहे. त्यांची दृश्यरचना आणि अवकाशाचा वापर परिपक्वतेचं दर्शन घडवतो. विशेष म्हणजे, दिग्दर्शकाने केवळ नाट्य दाखवण्यावर भर न देता त्यामागची सामाजिक-धार्मिक बांधिलकी अधोरेखित केली आहे. मात्र, पटकथेत काही दृश्यांचा ताण जाणवतो. गावकुसातील राजकारण आणि वादांवरील प्रसंग जर थोडक्यात घेतले असते, तर कथानक अधिक धारदार झालं असतं.. गीतकार गुरू ठाकूर यांनी साकारलेली डॉक्टरची व्यक्तिरेखा तसेच संवाद लेखन हा चित्रपटाचा ठळक पैलू आहे. संवादांमधील म्हणी, उपरोध आणि भावनिक टोक प्रेक्षकांना भिडतात. गाण्यांपैकी ''आवशीचो घो माझ्या करू तेचा काय'' हे गाणं गावजीवनाच्या भावविश्वाला अगदी नेमकं पकडतं. तसेच भक्तिरसाने भारलेलं एक गाणं आणि युद्धछटेसाठी रचलेला वीररसप्रधान पद्यांश कथानकाला बळकटी देतात. तरी काही गाणी थोडी जास्त वेळ खेचली गेल्याने गती




मंदावते. संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांनी पारंपरिक वाद्यांचा जिवंत वापर केला आहे. ढोल, ताशा, तुतारी आणि हार्मोनियम यांच्या सुरांनी लोककलेचं वातावरण अनुभवायला मिळतं. भक्तिरस, करुणा आणि वीररस या सर्व छटा संगीतामधून समरसून येतात. पार्श्वसंगीत काही ठिकाणी संवादांवर जड झालं असलं तरी एकंदर परिणाम प्रभावी आहे.



**गुरुदत्त वाकदेकर**
९९८७७४६७७६

**चित्रपट समीक्षण**

छायाचित्रकार देवेंद्र गोलतकर यांनी कोकणची निसर्गसंपन्नता पडद्यावर अप्रतिम पकडली आहे. हिरव्यागार रानातले देव-दानव युद्धाचे प्रसंग, समुद्रकिनाऱ्यावर उलगडलेलं मत्स्यावताराचं दृश्य आणि मंदिरे-रंगभूमीवरील प्रकाशयोजना हे विशेष उल्लेखनीय आहेत. निसर्ग हा इथे केवळ पार्श्वभूमी नसून कथानकाचा सह-नायक वाटतो. संकलक फैजल महाडिक यांनी कथानकाचा धागा साधारण नीट सांभाळला आहे, जरी काही ठिकाणी प्रसंगांचा अवधी अधिक वाटतो. रंगभूषा, मेकअप आणि वेशभूषेच्या दृष्टीने चित्रपट ठाम उभा आहे. बाबुलीच्या रुद्रावतारातला मेकअप, वेशभूषा आणि मुकुट-आभूषणांची भव्यता प्रेक्षकांना भारावून टाकते. मात्र काही ग्रामीण पात्रांची वेशभूषा अधिक वैविध्यपूर्ण दाखवली असती, तर वास्तवदर्शी परिणाम अधिक गडद झाला असता. चित्रपटाची सकारात्मक बाजू म्हणजे प्रभावळकरांचा अभिनय, स्थानिक कलाकारांचा सच्चेपणा, संवादांची ताकद, गीतांची लोकसंगीताशी असलेली सांगड, छायाचित्रणाची मोहकता आणि दिग्दर्शनाची संवेदनशीलता. असं असलं तरी काही उणिवा अशा पटकथेत काहीसा सैलपणा, प्रसंगांचा ताण, गाण्यांचा अवधी आणि अधूनमधून जड वाटणारं पार्श्वसंगीत. एकूणच दशावतार हा सिनेमा केवळ मनोरंजनासाठी नसून सांस्कृतिक अनुभव म्हणून बघावा असाच आहे. कारण मोठ्या पडद्यावरच लोकनाट्याची भव्यता, कलाकारांची उर्जा, निसर्गाची मोहकता आणि श्रद्धेची तीव्रता पूर्णतेने अनुभवता येते. त्यामुळे हा चित्रपट थिएटरमध्ये जाऊनच बघावा, तेव्हाच या कलेचं खरं सौंदर्य आणि आत्मा आपल्याला अनुभवायला मिळेल.

**चित्रपट : दशावतार (२०२५), निर्माते : सुजय हांडे, ओंकार काटे, सुबोध खानोलकर, लेखक : दिग्दर्शक: सुबोध खानोलकर, संवाद : गीत: गुरू ठाकूर, कलाकार : दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, सिद्धार्थ मेनन, प्रियदर्शिनी इंदलकर, विजय केंकरे, रवी काळे, अभिनय बेर्डे, सुनील तावडे, आरती वडगबाळकर, लोकेश मित्तल आणि इतर संगीत : ए. व्ही. प्रफुलचंद्र, छायांकन : देवेंद्र गोलतकर, संकलन : फैजल महाडिक**